# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

(नॅक समिती तर्फे ''अ'' दर्जा प्राप्त)

शैक्षणिक विभाग (०२४०)२४०३११८/२४०३११९
कुलसचिव (का.) २४०३३३४ (नि.)२४००२०३
फॅक्स :(०२४०) २४०३१२४, २४०३३३५
म.व.वि.वि.म. (का) (०२४०) २४०३२१३
Web Site-WWW.bamu.net
E-mail: bcud.office@bamu.ac.in

विद्यापीठ परिसर
औरंगाबाद-४३१००४
(महाराष्ट्र)

संदर्भ क्र. : शैक्षणिक / संलग्न/मान्यता/एमसीएम/२०१६-२०१७/ 20718-20 दिनांक : २५-१०-२०१६

प्रति,
प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद.

**विषय :- अध्यापकांच्या मान्यते बाबतचे प्रस्ताव सादर करताना सोबत जोडावयाच्या कागदपत्रा बाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, अनेक महाविद्यालयातील पूर्ण वेळ/ स्थानिक निवड समिती मार्फत निवड झालेल्या तसेच तासिका पद्धतीवर निवड झालेल्या उमेदवारंना मान्यता देणे बाबतचे प्रस्ताव विद्यापीठास सादर केले जातात. परंतु सदर प्रस्तावामध्ये बऱ्याच प्रकारच्या त्रुटी आढळून येत असल्यामुळे त्या प्रस्तावास मान्यता देणे अडचणीचे होत आहे. म्हणून आपणास या पत्राद्वारे असे कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील अध्यापकांच्या निवड व नियुक्तीस मान्यता देणे बाबतचे प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यापूर्वी खालील बाबींची पूर्तता करूनच प्रस्ताव या कार्यालयास सादर करावेत.

१) महाविद्यालयातील पूर्ण वेळ/स्थानिक पद्धतीने रिक्त पदे भरण्यासाठी विद्यापीठाच्या आरक्षण कक्षाची मान्यता घेणे.

२) अनुदानित महाविद्यालयानी पूर्ण वेळ/तासिका तत्त्वावर रिक्त पदे भरण्यासाठी सह. संचालक, उच्च शिक्षण औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांची नाहरकत घेणे.

३) आरक्षण कक्षाच्या मान्यते प्रमाणे व त्या मान्यता पत्रात नमूद केल्या प्रमाणे जाहिरात प्रसिद्ध करणे.

४) विद्यापीठाची निवड समिती घेणे.

५) निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारास नेमणूक आदेश देणे.

६) नेमणून केलेल्या उमेदवारांचा रूजू अहवाल महाविद्यालयाच्या आवक नोंदवहीत नोंद केलेला असावा.

७) नेमणूक केलेल्या उमेदवाराचा रूजू अहवाल ज्यात रूजू तारखेचा स्पष्ट उल्लेख असावा व सदर रूजू अहवालावर संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्यांनी स्वाक्षरी व शिक्का असावा.

८) संबंधीत उमेदवारांचे शैक्षणिक अर्हते बाबतची (गुणपत्रके) तसेच इतर आवश्यक ती कागदपत्रे सोबत जोडलेली असावीत.

९) वर नमूद केलेले मान्यतेचे प्रस्ताव शक्य तो माहे मे ते माहे ऑगस्ट या दरम्यान पाठवावेत.

जे महाविद्यालये वर नमूद केलेल्या बाबींची पूर्तता न करता अध्यापकांच्या मान्यते बाबतचे प्रस्ताव विद्यापीठास सादर करतील अशा प्रस्तावास विद्यापीठा मार्फत मान्यता दिली जाणार नाही. याची कृपया संबंधीतानी कटाक्षाने नोंद घ्यावी. तसेच उपरोक्त बाबींची पूर्तता करूण परीपूर्ण प्रस्ताव विद्यापीठास सादर करूण विद्यापीठ प्रशासनास सहकार्य करावे, हि विनंती.

सही/-
संचालक
महाविद्यालये व विद्यापीठ
विकास मंडळ.

प्रत :

०१ या पत्राची प्रत **मा. सह संचालक, उच्च शिक्षण,** औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना माहितीस्तव अग्रेषित.

०२ समन्वयक, निर्मल सॉफ्टवेअर प्रा. लि., डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहिस्तव अग्रेषित.

**संचालक**
महाविद्यालये व विद्यापीठ
विकास मंडळ.